महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
मॉडेल कॉलनी, बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे -४११०१६
दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र : तंशिविकापु/संकीर्ण /शै.वि.-४/२०२५/ 657 दिनांक : 24 FEB 2025

**परिपत्रक-**

**प्रति,**
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
सर्व संस्था, पुणे विभाग

**विषय : राज्यातील मुलींना उच्च शिक्षणासाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काचा ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ देण्यासाठीच्या शासन निर्णयाच्या प्रभावी अमलबजावणीबाबत.**

संदर्भ- १. संचालनालयाचे दि.२१.०२.२०२५ रोजीचे सुचनेनुसार
२. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२४-२५/६४ दि.०६.०२.२०२५
३. उच्च व तंत्रशिक्षण विभाग पत्र क्र.विकाक-२०२५/प्र.क्र.१८/तांशि-४, दि.३०.०१.२०२५
४. मा.मंत्री उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या दि.०४.०२.२०२५ रोजी प्रत्यक्ष भेटी दरम्यान झालेल्या सुचना.

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भिय पत्रांच्या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त संस्थांना कळविण्यात येते की, संदर्भ पत्र क्र.०१ मधील मुद्दा क्र.०२ नुसार मुलींना उच्च शिक्षणासाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ देण्याच्या शासन निर्णय निर्गमित होणे पूर्वी ज्या संस्थांनी मुलींकडून १००% अथवा ५०% टक्के शिक्षण शुल्क जमा करण्यात आले आहे. अशा संस्थांनी सोबत दिलेल्या गुगल फॉर्ममध्ये माहीती दि. २८.०२.२०२५ सायं.०५ वाजे पर्यंत भरावायाची आहे. (संदर्भ पत्र क्र.२ चे अवलोकन करावे.)

तसेच राज्यातील मुलींना उच्च शिक्षणासाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ दि.०८/०७/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०२४-२५ पासून लागू करण्यात आला असल्याने शासन निर्णयाची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्याच्या दृष्टीने संस्थांनी दि.१९.०७.२०२४ व दि.०९.०९.२०२४ रोजीच्या परिपत्रकामध्ये दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. परिपत्रकामध्ये दिलेल्या सुचनांचे पालन न करणाऱ्या संस्थाविरूद्ध नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल याची सर्व संस्था प्रमुख व प्राचार्यांनी नोंद घ्यावी.

सोबत- गुगल लिंक फॉर्म- https://forms.gle/iEtb3B7KKkcY8NwQ8

( मारुती रा.जाधव )
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- प्रोग्रामर, तं.वि.का. पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

FIC

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६
ई-मेल–desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

तात्काळ : स्पीडपोस्ट /ई-मेलद्वारे

क्र.:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२४-२५/ 68
दिनांक:- 06/02/2025

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे. 12 FEB 2025 आवक क्र. 952

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर

**विषय:-** राज्यातील मुलींना उच्च शिक्षणासाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काचा ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ देण्यासाठीच्या शासन निर्णयाच्या प्रभावी अमलबाजणीबाबत...

**संदर्भ:-** १. उच्च व तंत्रशिक्षण विभाग पत्र क्र. विकाक-२०२५/प्र.क्र.१८/तांशि-४, दि.३०/०१/२०२५.
२. मा. मंत्री उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या दि. ०४/०२/२०२५ रोजी प्रत्यक्ष भेटी दरम्यान दिलेल्या सुचना.

मा. मंत्रीमहोदय उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि. ०४/०२/२०२५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये राज्यातील मुलींना उच्च शिक्षणासाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काचा ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ देण्यासाठीच्या शासन निर्णयाच्या प्रभावी अमलबाजणी करण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देशित केले आहे.

(१) शासन परिपत्रक क्र. शासन परिपत्रक क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२०७/तांशि-४, दि.१९/०७/२०२४ व संचालनालयाचे परिपत्रक क्र. १८/ तंशिसं/ डीबीटी/विकाप/२०२४-२५/३६८, दि.०९/०९/२०२४ नुसार संस्थांमार्फत मुलींकडून प्रवेशाच्या वेळी कोणत्याही प्रकारचे शुल्क घेण्यात येऊ नये असे कळविण्यात आलेले होते. तरीही काही संस्थांकडून याबाबत कार्यवाही होत नाही अश्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत काय? आपल्या स्तरावरुन काय कार्यवाही केली ?

(२) संदर्भांकित शासन निर्णय निर्गमित होणे पूर्वी काही संस्थांमार्फत मुलींकडून पूर्ण अथवा ५० टक्के शुल्क जमा करण्यात आलेले असल्यास संबंधित विद्यार्थीनीस शुल्क परत केल्याबाबतचा अहवाल खालील प्रमाणे पाठविण्यात यावा.

| अ.क्र. | प्रवेश वर्ष | विद्यार्थीनींची संख्या | शुल्क परतावा रक्कम | चेक/बॅकेमार्फत रक्कम जमा केल्याबाबत पुरावा |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |

वरील मुद्यांबाबत आपल्या विभागातंर्गत ज्या संस्थांकडून जास्त प्रमाणात तक्रारी प्राप्त झालेल्या असतील अश्या संस्थांना सहसंचालक/सहाय्यक संचालक यांनी प्रत्यक्ष भेट देऊन त्याबाबतचा कार्यवाही अहवाल संचालनालयास दि. १२/०२/२०२५ पर्यंत पाठविण्यात यावा.

याबाबत विभागीय कार्यालयाचे सर्व सहसंचालक यांना कळविण्यात येते की, राज्यातील मुलींना उच्च शिक्षणासाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ दि. ०८/०७/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०२४-२५ पासून लागू करण्यात आला आहे. शासन निर्णयाची अमलबजावणी प्रभावीपणे होण्याच्या दृष्टीने दि.१९/०७/२०२४ व ०९/०९/२०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये दिलेल्या सुचनांचे काटेकारपणे पालन करण्याबाबत आपल्या अखत्यारित येणाऱ्या सर्व शैक्षणिक संस्थांना पुन्हा कळविण्यात यावे, व सुचनांचे पालन न करणाऱ्या संस्थाविरुध्द नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल असे निर्देश द्यावेत.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

प्रत. मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सादर.
(लक्षवेध-श्री. अजितकुमार थोरात, कक्ष अधिकारी)